**वस्त्रोद्योग धोरण २०११-२०१७ अंतर्गत विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील नवीन व विस्तारीकरणाच्या वस्त्रोद्योग घटकांना १०% भांडवली सवलत वितरीत करणेबाबत .**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक बैठक-२०१४/प्र.क्र.७४/भाग-१५/टेक्स-२**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- २० मार्च, २०१४**

**वाचा :-१**. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/ प्र.क्र.२/टेक्स-२, दिनांक १ मार्च, २०१२

२. शासन शुध्दीपत्रक समक्रमांक, दिनांक १२ मार्च, २०१२ आणि दिनांक ८ मे, २०१३.

३. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण-२०१२/ प्र.क्र.२५७/टेक्स-२, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१४

४. संचालक, वस्त्रोद्योग, नागपूर यांचे क्र.१२८९, दि.७/२/१४ चे पत्र.

**प्रस्तावना :-**

वरील संदर्भीय अनुक्रमांक १ येथील दिनांक १ मार्च, २०१२ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याच्या नवीन वस्त्रोद्योग धोरणांतर्गत विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील नवीन व विस्तारीकरणाच्या वस्त्रोद्योग घटकांना १०% भांडवली सवलत देण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत सारा स्पिन्टेक्स प्रा. लि., मोहा, जि. यवतमाळ (UID NO २०१३/S/००७९१) या वस्त्रोद्योग घटकास १०% भांडवली सवलत वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील वस्त्रोद्योग धोरण २०११-२०१७ अंतर्गत विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील नवीन व विस्तारीकरणाच्या वस्त्रोद्योग घटकांना १०% भांडवली सवलत योजनेअंतर्गत सारा स्पिन्टेक्स प्रा. लि., मोहा, जि. यवतमाळ (UID NO २०१३/S/००७९१) या वस्त्रोद्योग घटकास **रु.४,०७,९०,०००/- ( अक्षरी रुपये चार कोटी सात लाख नव्वद हजार फक्त** ) इतकी रक्कम १०% भांडवली सवलतीपोटी मंजूर करुन वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर वस्त्रोद्योग घटकाचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| | |
|---|---|
| वस्त्रोद्योग घटकाचे नांव व ठिकाण | सारा स्पिन्टेक्स प्रा. लि., धामणगांव रोड, मु. मोहा, जि. यवतमाळ |
| UID NO / NON UID घटक | UID क्रमांक प्राप्त |
| UID NO व दिनांक | २०१३/S/००७९१, दि.०४/०७/२०१२ |
| प्रकल्प घटक | स्पिनिंग |
| कर्ज मंजूरीचा दिनांक | ०७/०३/२०१२ |
| बँकेचे नांव | बँक ऑफ बरोडा |
| बँकेचा प्रकार | नोडल बँक |
| प्रकल्प उत्पादनाखाली आल्याचा दिनांक | ०१/०४/२०१३ |
| प्रकल्प किंमत (रुपये लाखात) | ६०७२.०० |
| TUFS योजनेअंतर्गत व्याज सवलतीसाठी कर्जाची पात्र रक्कम (रुपये लाखात) | ४९७९.०० |
| बँकेने / वित्तीय संस्थेने १०% भांडवली सवलतीपोटी मागणी केलेली रक्कम (रुपये लाखात) | ४०७.९० |
| संचालकांनी शिफारस केलेली रक्कम (रुपये लाखात) | ४०७.९० |
| राज्य योजनेअंतर्गत समितीने मंजूर केलेली १०% भांडवली सवलत रक्कम (रुपये लाखात) | ४०७.९० |

३. सदरहू वस्त्रोद्योग घटकास वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली रक्कम योजनेच्या दिशानिर्देशानुसार **बँक ऑफ बडोदा** यांचे खालील नमूद खात्यावर R.T.G.S. द्वारे वितरीत करण्यात यावी :-

**Bank Name :- BANK OF BARODA**
**Name of A/C :- SUNDRY DEPOSIT INTERIM TUFS**
**IFSC :- BARBOBANEAS**
**A/c No. :- 29040200000009**

४. वरीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेली १०% भांडवली सवलतीची रक्कम **बँक ऑफ बडोदा** यांनी सारा स्पिन्टेक्स प्रा. लि., मोहा, जि. यवतमाळ (UID NO २०१३/S/००७९१) या वस्त्रोद्योग घटकाच्या कर्ज खात्यात वितरीत करुन त्याबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

५. वरील प्रमाणे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम संबधित बँकेस वितरीत करण्याकरीता श्रीमती अ. अ. चुरी, कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच श्री. र. मो. आडे, उप सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,

मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी या आदेशाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई येथून आहरीत करुन **BANK OF BARODA, Name of A/C:- SUNDRY DEPOSIT INTERIM TUFS, IFSC :- BARBOBANEAS, A/c No.:- 29040200000009** यांना वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

६. यावर होणारा खर्च " मागणी क्रमांक व्ही-२, २८५१- ग्रामोद्योग व लघुउद्योग, ११०, संमिश्र ग्रामोद्योग व लघुद्योग आणि सहकारी संस्था (दोन) पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२) (६५) मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्र मधील नवीन वस्त्रोद्योग घटकांना १०% भांडवली अर्थसहाय्य (२८५१ ५९ ९९) दत्तमत ३३, अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली सन २०१३-१४ या वित्तीय वर्षासाठी मंजूर असलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

७. सदर शासन निर्णय, संदर्भिय अ.क्र. ३ येथील शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या दि.१५/३/२०१४ रोजी संपन्न बैठकीत प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार तसेच उपरोक्त शासन निर्णयान्वये वस्त्रोद्योग विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**( र. मो. आडे )**
**महाराष्ट्र शासनाचे उप सचिव**

प्रति,

महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर
महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१ / २, मुंबई / नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
अ.मु.स. नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई
अ.मु.स. वित्त विभाग (व्यय-२), मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई
संचालक (वस्त्रोद्योग), वस्त्रोद्योग संचालनालय, नागपूर.
उप सचिव (वस्त्रोद्योग), स.प. व व.वि., मंत्रालय, मुंबई
कार्यासन अधिकारी (रोखशाखा) (३ प्रती / कार्यासन -१७ स)
प्रवर्तक, संबधित वस्त्रोद्योग घटक (ई-मेल व्दारे)
मॅनेजर, बँक ऑफ बडोदा (टफ सेल) (ई-मेल व्दारे)
संबंधित वस्त्रोद्योग घटकाच्या स्वतंत्र नस्ती
निवड नस्ती (टेक्स-२)